पुढारी ५-०२-२३

# करावायांमुळे मिरा-भाईंदर परिसरात सोनसाखळी चोरीचे प्रमाण घटले

## २०२१ मध्ये ११३, तर २०२२ मध्ये ४१ गुन्ह्यांची नोंद

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२२ या वर्षभरात सोनसाखळी चोरीचे ४१ गुन्हे दाखल झाले आहेत. २०२१ मध्ये ११३ गुन्हे दाखल होते. यावरून २०२२ या वर्षात सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये निम्म्याहून अधिक घट झाल्याचे दिसून येते. पोलिसांनी सोनसाखळी चोरी करणाऱ्या टोळ्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केल्यामुळे या गुन्ह्यात घट झाल्याचे सांगितले जाते.

मिरा-भाईंदर व वसई विरार शहरातील सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना लक्ष करून सोनसाखळी चोरट्यांकडून २०२१ मध्ये चोऱ्या केल्याच्या ११३ घटना घडल्या होत्या. शहरात मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त असतानाही अशा घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये देखील भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सोनसाखळी चोरांच्या टोळ्या सक्रिय होत्या. या चोऱ्या करणारे गुन्हेगार स्थानिक पोलिसांच्या यादीवरील नसल्याने त्यांचा शोध घेण्यास अडथळा येत होता. त्यामुळे या चोरांचा शोध घेणे पोलिसांसमोर आव्हान होते. या गुन्ह्याचा पोलिसांकडून तपास केला जात होता. त्यानुसार घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेरे, चोरट्यांचा वाहन क्रमांक व इतर माहितीच्या आधारे राज्यभरासह परराज्यातील सोनसाखळी चोरांना पोलिसांकडून अटक करण्यात आली होती .अनेक घटनांमध्ये त्यांच्या संपूर्ण टोळ्यांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये घट झाल्याचे दिसून येते. त्यानंतर २०२२ मध्ये वर्षभरात ४१ सोन साखळी चोरीच्या घटनांची नोंद झाली असून हे प्रमाण २०२१ च्या तुलनेत ६४ टक्क्यांनी कमी आहे . मागील वर्षभरात वसई विरार शहरात आचोळे व विरार पोलिस ठाण्याच्या हद्दीत सोन साखळी चोरीचे सर्वाधिक गुन्हे घडले आहेत . त्यानंतर नवघर पोलिस ठाणे हद्दीत अधिक गुन्ह्यांची नोंद आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२१ मध्ये सोनसाखळी चोरीच्या ११३ गुन्हे दाखल असून यातील ७५ गुन्हे उघडकीस आणले आहेत. २०२२ मध्ये ४१ गुन्हे दाखल असून केवळ २३ गुन्हे उघडकीस आणले आहे. त्यामुळे दाखल गुन्ह्यांप्रमाणेच ते गुन्हे आणण्याचे प्रमाणात देखील घट झाल्याचे दिसून येते.

---

सामना ०५-०२-२३

# नशेची हुक्की आली की तो उचलायचा बाईक

## काशिमीरा पोलिसांनी ठोकल्या चोराला बेड्या

**भाईंदर, दि. ६ (सा.वा.)** – नशेची हुक्की आली की वेडापिसा होणाऱ्या नशेबाजाने ही तल्लप भागवण्यासाठी थेट दुचाकी चोरीचा गोरखधंदा थाटल्याची धक्कादायक माहिती,काशिमीरा पोलिसांच्या तपासात समोर आली आहे. पोलिसांनी या अट्टल दुचाकी चोराला बेड्या ठोकल्या असून त्याच्याकडून तब्बल दहा दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

काशिमीरा भागात राहणारे राजेश जैन यांची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरी केली होती. याबाबत त्यांनी काशिमीरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत दिवसेंदिवस मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्यामुळे या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांना वरिष्ठांनी सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ चे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, पुष्पराज सुर्वे, संतोष चव्हाण, राजू तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडिले, संदीप पाटील यांच्या पथकाने सराईत दुचाकी चोर विघ्नेश मिश्रा (२३) याला ताब्यात घेतले. मजुरी करणाऱ्या विघ्नेश याला नशापाण्याची हुक्की आल्यानंतर तो चोऱ्या करत असल्याची माहिती चौकशीत समोर आली.

क्राईम फाईल

## नालासोपाऱ्यात विकृताविरोधात गुन्हा

**वसई :** महिलेचे अश्लील फोटो व्हॉटस ॲपवर पाठवणाऱ्या विकृताविरोधात तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालासोपारा पूर्व डोंगरी पाडा येथे राहणाऱ्या ३७ वर्षीय विवाहितेला अज्ञात आरोपीने अश्लील फोटो पाठवले. याप्रकरणी महिलेने तिचा विनयभंग केल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली. तुळींज पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून विकृताविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

---

पुढारी ५-०२-२३

## ड्रग्जविरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन

**वसई :** आखिल भारतीय विद्यार्थी परिषद वसई द्वारा स्वावलंबी युवा भारत अभियान असा कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम दि. ०७ फेब्रुवारी २०२३ रोजी शादी डॉट कॉम हॉल,अंबावडी, नालासोपारा पूर्व येथे सकाळी ९ वा. सुरू होईल. या कार्यक्रमात वसईतील ९ शाळा, १० कनिष्ठ महाविद्यालय व ६ वरीष्ठ महाविद्यालयातून १२०० विद्यार्थी सहभागी होत असून यावेळी ड्रग्ज विरोधी जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. त्यात प्रमुख पाहुणे म्हणून रोबोटिक्स उद्योजक श्री अभिमन्यु राजा (सहसंस्थापक जनयु टेक) हे उपस्थित असतील. त्याच बरोबर विशेष उपस्थिती म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रिय कार्यकारीणी सदस्य कु. तनया पारकर आणि मुंबई महानगर मंत्री ओमकार मांढरे जी उपस्थित असतील, अशी माहिती अभाविप वसई जिल्हा संयोजक मनीषा मोदी यांनी दिली. या कार्यक्रमात वसईतील शैक्षणिक आणि सामाजिक स्थितीवर दोन प्रस्ताव विद्यार्थी चर्चा करून पारित करणार आहे. सर्व विद्यार्थ्यांची रॅली देखील काढणार आहेत. शालेय आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेच्या मूल्यांचा विकास व्हावा आणि वसईतील शालेय व महाविद्यालयीन परिसर नशामुक्त व्हावा म्हणून जागरूकता निर्माण करणे असा ह्या कार्यक्रमाचा उद्देश्य आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ.५/७

# अदानीविरोधात काँग्रेसचे आंदोलन



। मीरा रोड : अदानी हिंडनबर्ग विषयानंतर देशातील जनतेत सरकारविरोधात संतापाचे आणि अविश्वासाचे वातावरण तयार होण्यास सुरुवात झाली आहे. अदानी समूहाने एफपीओ मागे घेतल्यानंतर शेअर बाजारात सर्वसामान्य जनता, खासगी गुंतवणूकदार आणि अनेक इन्व्हेस्टमेंट कंपन्या यांच्या गुंतवणुकीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यातच एलआयसी आणि एसबीआयसारख्या मोठ्या कंपन्यांच्या हजारो कोटी रुपयांच्या गुंतवणुकीमुळे सामान्य जनतेच्या ठेवींवर काँग्रेसने चिंता व्यक्त केली आहे. काँग्रेसने मीरा रोड येथील शिवार गार्डन येथे अदानीविरोधात आंदोलन करून जोरदार निषेध केला.

मीरा-भाईंदर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि युवक काँग्रेसच्या वतीने धिक्कार आंदोलन केले. जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांच्या नेतृत्वात मीरा-भाईंदर शहरातील काँग्रेसी कार्यकर्त्यांनी जनतेसमोर अदानी घोटाळा उघड करण्याचा प्रयत्न केला. अदानी समूहावरील हिंडनबर्ग अहवाल आल्यानंतर अदानी समूहाचे शेअरचे भाव मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. तरीदेखील केंद्रातील भाजप सरकार याची दखल घेत नाही, हे दुर्दैवी आहे, असे मत सामंत यांनी मांडले. मोदी सरकार जाणूनबुजून हा अदानी घोटाळा लपवत आहे. अदानीला पत नसताना भाजपच्या दबावाखाली कर्ज देऊन सर्वसामान्य खातेदारांचे पैसे एसबीआयने बुडवले आहेत, असे मत मांडत दीप काकडे यांनी प्रधानमंत्री यांनी अदानीला दिलेले कर्ज वसूल करून दाखवावे, असे आव्हान दिले. या आंदोलनाला माजी नगरसेविका मर्लिन डिसा व गीता परदेशी, प्रदेश प्रतिनिधी महेंद्र सिंह, कार्याध्यक्ष फरीद कुरेशी, राकेश राजपुरोहित, एकनाथ पाटील; महिला जिल्हाध्यक्ष रुपा पिंटो, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सचिव दीप काकडे, प्रदेश सोशल मीडिया सचिव यास्मिन खान, मीरा-भाईंदर युवक काँग्रेस अध्यक्ष सिद्धेश राणे, ओवळा माजिवडा युवक काँग्रेस अध्यक्ष कुणाल काटकर आणि कार्यकर्ते, महिला, युवक उपस्थित होते.

पुढारी पा.नं.३.

# दुचाकी चोरणाऱ्या चौकडीचा पर्दाफाश

नालासोपारा : नालासोपाऱ्यात आचोळे पोलिसांनी मोटारसायकल चोरणाऱ्या चौकडीचा पर्दाफाश करून २ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास आचोळे पोलीस करीत आहेत. आचोळे परिसरात मोटार सायकल चोरीची तक्रार २५ जानेवारी २३ ला केली होती आचोळे पोलिसांनी चोरट्यांच्या विरोधात मोहीम उघडली होती.

यावेळी २ आरोपी मोटारसायकल विक्री साठी अलकापुरी येथे येणार असल्याची खबर आचोळे पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला मिळाल्या नंतर पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत सरोदे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुधिर गवळी,गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. यशपाल सुर्यवंशी, पो.उ.नि. सुहास म्हात्रे, स.फौ. राजेश काळपुंड, पो.हवा. दत्तात्रय दाईगडे, डी. एस. पाटील, सतिष चव्हाण, पो. अं. विनायक कचरे यांनी सापळा रचून सलाउद्दीन खान आणि विपीन राय यांना ताब्यात घेवून चौकशी केली असता चोरलेली मोटारसायकल जीशान खान याला विक्री केल्याचे सांगितल्यावर जीशानला अटक केल्या नंतर चोरीच्या गाड्या भंगार विक्रेत्याकडे पोहोचवणारा टेम्पो चालक अविनाश वाल्मिकी याला अटक करून त्यांच्या कडून २,०३६०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

Scanned with CamScanner

लोकमत ५.५.१९.

# पैसे काढण्याआधीच रक्कम पुन्हा खात्यात

## गमावलेले लाखो रुपये पोलिसांमुळे परत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** ५०० रिवॉर्ड पॉइंट मिळवण्याच्या हव्यासापायी अनोळखी लिंक क्लिक करून क्रेडिट कार्डची माहिती भरल्याने ऑनलाइन गमावलेले साडेचार लाख रुपये मीरा - भाईंदर, वसई - विरार पोलिसांच्या मीरारोड येथील सायबर शाखेने परत मिळवून दिले आहेत. रक्कम रोझरपे या पेमेंट गेटवेद्वारे गेल्याचे समजताच पोलिसांनी कंपनीस त्वरित पत्र पाठवून पाठपुरावा केला. त्यामुळे सायबर लुटारूने पैसे काढून घेण्याआधीच ती थांबवण्यात येऊन शर्मा यांच्या खात्यात जमा करण्यात आली.

वसई पूर्वेच्या एव्हरशाईन सिटीमधील नेमिनाथ टॉवरमध्ये राहणारे दुष्यंत कुमार शर्मा यांना त्यांच्या मोबाइलवर एसएमएसद्वारे ५०० रिवॉर्ड पॉइंट वाढवण्यासाठी अनोळखी व्यक्तीकडून लिंक आली होती. शर्मा यांनी लिंक क्लिक केल्यानंतर क्रेडिट कार्डची माहिती भरली असता त्यांच्या क्रेडिट कार्डमधून ४ लाख ५० हजार रुपये सायबर लुटारूने काढून घेतले.

### खबरदारीचे आवाहन

नागरिकांनी अशा प्रकारे फसव्या एस. एम. एस. अथवा कॉलला उत्तर देऊ नये. कॉल आलेल्या व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्म दिनांक, ओटीपी वा इतर वैयक्तिक माहिती उघड करू नये. कोणताही अनोळखी कॉल आल्यास त्याची विश्वासार्हता पडताळावी, असे आवाहन पोलिसांच्या सायबर शाखेने केले आहे.

याप्रकरणी सायबर शाखेचे पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सहायक निरीक्षक स्वप्नील वाव्हळ यांच्यासह संतोष चव्हाण, प्रवीण आव्हाड, सुवर्णा माळी, आमिना पठाण, आकाश बोरसे, प्रशांत सिरामे, राजेश भरकडे यांच्या पथकाने शर्मा यांच्या तक्रारीवर तत्काळ तपास सुरू केला. पोलिसांनी व्यवहाराबाबत माहिती प्राप्त केली असता फसवणूक करून घेतलेली रक्कम रोझरपे या पेमेंट गेटवेद्वारे गेल्याचे दिसून आले. पोलिसांनी कंपनीकडे पाठपुरावा करून रक्कम थांबवून शर्मा यांच्या खात्यात जमा केली.

सकाळ ५.५.१९.

# पालिकेच्या विरोधात रहिवाशांचे आंदोलन

नालासोपारा, ता. ६ (वातमीदार) : महापालिकेने १५ वर्षांपासून राहणाऱ्या रहिवाशांना हक्काचे घर तोडण्याची नोटीस दिल्याने संतप्त रहिवाशांनी सोमवारी वालिव पोलिस ठाण्यावर मोर्चा काढून आपला रोष व्यक्त केला. शहरात अनधिकृत चाळी बांधताना पालिकेचे अधिकारी आणि जमीनमालक झोपले होते का, असा सवाल करून भ्रष्ट अधिकारी आणि जमीनमालकावर गुन्हे दाखल करण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. तसेच ही चाळ मोक्याच्या ठिकाणी असल्याने जमीनमालक, बिल्डर आणि पालिकेला हाताशी घेऊन घर तोडत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

नायगाव पूर्वेकडील चंद्रपाडा येथील साई श्रद्धा ही चाळ मुख्य रस्त्याच्या समोर असून, येथे नवीन एफएसआयनुसार उंच टोलेगंज इमारत उभी राहू शकते. या चाळीतील रहिवाशी गेल्या १५ वर्षांपासून येथे राहत आहेत. येथे त्यांना पालिकेने घरपट्टी लावली आहे. येथे आज घडीला ६४ कुटुंबे राहतात. मात्र मुख्य रस्त्यालगत चाळ असल्याने, नव्या एफएसआयप्रमाणे आता येथे चाळी तोडून टोलेगंज इमारत उभी करण्याचे मनसुबे आखून जमीनमालकाने कोर्टाकडून चाळी तोडण्यासंबंधीचे आदेश आणले आहेत.

पालिकेने कोर्टाच्या आदेशाप्रमाणे चाळीतील रहिवाशांना चाळ तोडण्याची नोटीस दिली आहे. आपला १५ वर्ष जुने घर तुटणार या भीतीने आता सर्व रहिवाशी चिंतेत आहेत. अनधिकृत चाळी बांधताना पालिका आणि जमीनमालक काय झोपले होते का, असा सवाल करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी या रहिवाशांनी वालिव पोलिसांकडे केली आहे. त्यासाठी सोमवारी सर्व रहिवाशांनी वालिव पोलिस ठाण्यासमोर एकत्र जमून आंदोलन केले होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांनी या आंदोलनात स्वतः सहभागी होऊन आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दिला आहे.

Scanned with CamScanner

सकाळ पा. नं. ५.

# वसईत २५ विकसकांवर गुन्हा

## पालिकेच्या जागांवर अतिक्रमण; आचोळे पोलिसांत तक्रार

विरार, ता. ६ (बातमीदार) : वसई-विरार महापालिका हद्दीतील विविध प्रकल्पासाठी आरक्षित जागांवर अतिक्रमण झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये पालिकेच्या डम्पिंग ग्राऊंड आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या आरक्षित जागांवर देखील अतिक्रमण झाले असून यामुळे हे दोन्ही प्रकल्पांचे काम रखडले आहे. त्यामुळे पालिकेने या जागांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी पालिकेने मागील वर्षापासून हालचाली सुरू केल्या होत्या. आता अतिक्रमण केलेल्या विकसकांवर गुन्हा दाखल करण्यात आला. एकूण २५ विकसकांवर गुन्हा दाखल केल्याचे पालिका प्रशासनाने सांगितले.

वसई - विरार महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाली आहेत. यासाठी पालिकेने मागील वर्षात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली होती. त्यानंतर आता पालिकेने आपला मोर्चा आरक्षित जागांवरील अतिक्रमण हटविण्याकडे वळवला आहे. आरक्षित जागांवरील अतिक्रमणांचा सर्वे पालिकेने केला. त्यातील अतिक्रमण केलेल्या विकसकांना दिलेल्या मुदतीत अतिक्रमण हटविण्याबाबत पालिकेने नोटिसा बजावल्या. मात्र या नोटिसा बजावून देखील त्यावर कार्यवाही न केल्याने अखेर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यामध्ये सर्वात आधी महापालिकेच्या डी प्रभागच्या सहायक आयुक्त विशाखा मोटघरे यांच्या तक्रारीवरून आचोळे पोलिसांनी २५ विकसकांविरोधात गुन्हा दाखल केला.



**गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची यादी :**
न्यू कालिका ढाबा, महावीर अपार्टमेंट, सनशाईन अपार्टमेंट, शुभम अष्टविनायक वेल्फेअर सोसायटी, जय महाकाल अपार्टमेंट, साई गणेश संजय अपार्टमेंट, श्रीनिवास अपार्टमेंट, श्री सिद्धिविनायक अपार्टमेंट, हिरावती पॅलेस, महादेव अपार्टमेंट, एम आर अपार्टमेंट, महादेव अपार्टमेंट, रूप अपार्टमेंट, प्रियांका अपार्टमेंट, ओमसाई अपार्टमेंट, साईश्रद्धा अपार्टमेंट, रोशनी अपार्टमेंट, वास्तूनिर्माण, सिद्धिविनायक अपार्टमेंट, साई राज अपार्टमेंट, सद्गुरू कृपा अपार्टमेंट, श्रद्धा सबुरी अपार्टमेंट आणि साई राज अपार्टमेंट.

नालासोपारा पूर्व वसंत नगरी येथील सर्व्हे क्रमांक २२ ते ३४ या जागेवरील डम्पिंग ग्राऊंड आणि एसटीपी प्लांटसाठी ही जागा आरक्षित होती. २००८ मध्ये या ठिकाणी अनेक बेकायदा इमारती बांधण्यात आल्या आहेत. या इमारतींमध्ये शेकडो कुटुंबे राहत आहेत. २०२१ मध्ये तत्कालीन सहायक आयुक्त रतेश किणी यांनी ४१ इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसा बजावल्या होत्या. मात्र वर्षानुवर्षे येथे राहणाऱ्या लोकांना जागा सोडायची नाही. अखेर सहायक आयुक्त विशाखा मोटघरे यांनी अनधिकृतपणे इमारती बांधणाऱ्या २५ विकसकांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

लोकसत्ता ५-पा-३.

## महिलेची हत्या करणारा अटकेत

**वसई :** विरारमध्ये राहणाऱ्या प्रियंका पाटील या नवविवाहितेच्या हत्येप्रकरणी तिच्या फरार पतीला पोलिसांनी अटक केली आहे.

विरार पूर्वेतील शंकरपाड्यातील जीवदानी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या प्रियंका ऊर्फ पिंकी पाटील (२५) हिची बुधवार, १ फेब्रुवारी रोजी हत्या करण्यात आली होती. या हत्येनंतर तिचा पती फरार होता. विरार पोलिसांनी यापूर्वीच त्याचा साथीदार संकेत राऊत याला अटक केली. तर, पती वैभव पाटील याला रविवारी भिवंडी येथून विरारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली.

## विरारमध्ये वेश्याव्यवसायावर कारवाई

**वसई :** 'जस्ट डायल'वरून सुरू असलेला वेश्याव्यवसाय अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या नालासोपारा शाखेने उघडकीस आणला आहे.

पोलिसांनी विरारच्या 'ग्लोबल सिटी' येथील साहिल स्पावर छापा टाकला. त्यावेळी मसाजच्या नावाखाली तेथे वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे उघड झाले. याप्रकरणी पोलिसांनी शीतल नाईक व साहिल ऊर्फ फैजान खान यांना अटक करून एका पीडित महिलेची सुटका केली, अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांनी दिली.


Scanned with CamScanner

लोकसत्ता पु.पा.४.

# वर्सोवा पुलासाठी आणखी प्रतीक्षा

## उद्घाटनाचा २० फेब्रुवारीचा मुहूर्त टळणार; काही दिवसांत सुरत-ठाणे पहिली मार्गिका खुली

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**वसई :** वर्सोवा खाडीवरील पुलाचे बांधकाम अंतिम टप्प्यात असले तरी उद्घाटनाचा २० फेब्रुवारीचा मुहूर्त लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यात होणाऱ्या आढावा बैठकीत पूल सुरू होण्याची तारीख निश्चित होणार आहे. दरम्यान पुढील काही दिवसात सुरत-ठाणे ही पहिली मार्गिका खुली केली जाईल, असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सांगितले.

मुंबई आणि गुजरातला जोडण्यासाठी घोडबंदर येथील वर्सोवा खाडीवर पूल तयार करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ वर हा सव्वा दोन किलोमीटर लांबीचा पूल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे बांधला जात आहे. या पुलाचे काम फेब्रुवारी २०२१ रोजी पूर्ण करण्यात येणार होते. मात्र सुरुवातीला या पुलाचे काम अगदी संथ गतीने सुरू होते. त्यामुळे या कामाला ३० जून २०२२ पर्यंत मुदत वाढही देण्यात आली होती. त्यातच दोन वर्षे करोनाचे संकट उद्भवले आणि या पुलाचे काम आणखीनच लांबणीवर पडले होते. या नवीन पुलाच्या पहिल्या टप्प्याचे काम २० फेब्रुवारी रोजी पूर्ण करून तो वाहतुकीसाठी खुला केला जाणार असल्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जाहीर केले होते.

पुलाचे काम प्रगतिपथावर असले तरी ते पूर्ण झालेले नाही. त्यामुळे उद्घाटनाचा २० फेब्रुवारीचा मुहूर्त चुकणार आहे. पहिल्या टप्प्यात सुरत ते ठाणे ही मार्गिका सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्याचे काम प्रगतिपथावर आहे. पुढील आठवड्यात कामासंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली असून त्यानंतर पूल कधी सुरू होणार ते जाहीर करण्यात येईल, असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक मुकुंदा अत्तरदे यांनी सांगितले. पहिल्या मार्गिकेचे बहुतांश काम पूर्ण झाले असून लवकरच ती खुली केली जाईल. त्याला विलंब लागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### नवीन पूल कसा?

भाईंदर खाडीवर पहिला पूल १९६८ मध्ये बांधण्यात आला होता. हा पूल आताच कमकुवत झाला आहे. त्यामुळे नवीन पुलाची निर्मिती करण्यात येत आहे. जुन्या वर्सोवा पुलाच्या शेजारी नवीन वर्सोवा पूल तयार करण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे करण्यात येत आहे. हा पूल ४ मार्गिकाचा आहे. जानेवारी २०१८ मध्ये या पुलाच्या कामाला सुरुवात झाली होती. या पुलाच्या निर्मितीसाठी २४७ कोटी रुपये खर्च आला आहे. त्याची लांबी २.२५ किलोमीटर एवढी आहे.

Scanned with CamScanner

# ₹2.45L lost to power cut fraud

SURESH GOLANI
Mira-Bhayandar

An elderly man from Bhayandar lost Rs.4.5 lakh to the infamous electricity bill fraud. In his complaint to the police, the senior citizen stated that he received a call from someone claiming to be an official of a power supply company. Claiming that an amount of Rs11 had remained pending which would lead to the disconnection of electricity to his flat, the caller offered to help the complainant in making the payment. The complainant was asked to click on a link to clear the dues from his bank account after which Rs2.45 lakh was deducted through multiple withdrawals. The fraudster had apparently made him install a remote access application to take control of his cell phone and bank accounts. An offence under relevant sections of the Indian Penal Code and Information Technology Act (2000) has been registered against the yet-to-be-identified caller at the Navghar police station in Bhayandar. The Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have been urging people to be vigilant and check with power companies before dealing with such callers or responding to unverified messages or dubious links.

# Man recovers ₹4.5L lost in online fraud

SURESH GOLANI
Mira-Bhayandar

The cyber crime cell of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police helped a man recover Rs4.5 lakh that was siphoned off from his bank account on Feb 3. According to the police, Dushyant Kumar received a link on his cell phone tagged with an offer of increasing the reward points of his credit card. He clicked on the link and shared important details. Minutes later, Rs4.5 lakh was transferred from his account. Kumar immediately contacted the cyber cell and registered his complaint.

The cyber cell managed to reverse the transaction by establishing contact with the gateway of the digital platform that provides recharge and payment solutions within 48 hours.

Stressing upon the need to be careful while dealing with unknown callers / senders, a senior police official said that people can call the cyber crime cell on 1930 / 28110135 or send a WhatsApp message on 900 488 0135 or email at cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in to report online frauds. Notably, 794 cyber crimes were reported in 2021 and 2,738 in 2022.

THE FREE PRESS JOURNAL
Wed, 08 February 2023
https://epaper.freepre

Scanned with CamScanner

लोकमत

# अल्पवयीनांचे लग्न लावाल तर तुरुंगवास

## वसईत चार बालविवाह रोखण्यात पोलिसांना यश

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा असून, यावर कारवाईसाठी शासनाने कठोर पावले उचलली आहेत. यासाठी जिल्हास्तरावर विशेष पथक गठित करून नजर ठेवली जात आहे.

अल्पवयीन बालकांच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या बनत आहेत. वसईतील तुळींज येथे २, विरार येथे १ आणि आचोळे येथे १, असे ४ बालविवाह गुन्ह्यांची नोंद आहे. बालविवाह रोखण्यात पोलिस आयुक्तालयातील पोलिसांना यश मिळाले आहे. भारतीय संस्कृतीत विवाह ही समाजातील महत्त्वाची क्रिया आहे. वसईत बालविवाह होऊ नये म्हणून प्रशासनाने कारवाईचे काम हाती घेतले आहे.

अल्पवयीनांचे लग्न लावून देणाऱ्यांवर किंवा विवाहात प्रत्यक्षात मदत करणाऱ्यांवर, त्यात सामील होणाऱ्यांवर कारवाई होते. त्यांना तुरुंगवासही होऊ शकतो.

### काय आहे बालविवाह प्रतिबंधक कायदा?




बालविवाह प्रतिबंधक कायद्याप्रमाणे १८ वर्षांहून लहान मुलगी व २१ वर्षांहून कमी वयाचा मुलगा कायदेशीर विवाहासाठी योग्य नसेल. यांच्यातील एकही अल्पवयीन असेल तर बालविवाह ठरतो. असा विवाह करून देणारी व्यक्ती कायद्यानुसार गुन्हेगार आहेत.

### बालविकास विभागाची नजर

हा कायदा सर्व धर्मांना लागू आहे. बालविवाहाची माहिती १०९८ या क्रमांकावर चाइल्ड लाईनला फोन करून कळविता येते. महिला व बालविकास मंत्रालय भारत सरकारचा एक उपक्रम असून ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलामुलींची मदत करता येते.

### ...तर पालकांना तुरुंगवास



बालविवाह झाल्यास संबंधित वर या वधूचे आई-वडील किंवा पालक, अन्य नातेवाईक, मित्र परिवार असे सर्व, ज्यांनी हा विवाह घडविण्यास प्रत्यक्षात मदत केली किंवा तो न होण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, या जे अशा विवाहात सामील झाले होते, अशा सर्वांना दोन वर्षांपर्यंत सक्त मजुरीची कैद व एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

### माहिती देणाऱ्यांचे नाव गुप्त

एखाद्या परिसरामध्ये बालविवाह होत असल्याची जी व्यक्ती माहिती देते, तिचे नाव गुप्त ठेवण्यात येते. परंतु आतापर्यंत बालविवाहासंबंधी माहिती देण्यासाठी ज्या मुलीचा विवाह आहे, तीच मुलगी किंवा तिची मैत्रीण अथवा तिच्या अत्यंत जवळची व्यक्तीच फोन करीत असते. असा अनुभव पोलिसांनी सांगितला आहे. बालविवाहाची माहिती पोलिसांना देण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा.

### प्रसूतीच्या वेळी उघड झाले अल्पवयीनांचे लग्न

१. संतोष भवन येथे राहणाऱ्या पीडित मुलीचा विवाह तिच्या आई-वडिलांनी ती वयाने लग्नास उपवर झालेली नसतानाही एका व्यक्तीसोबत ३० जून २०२० रोजी केला होता. तिला लग्नानंतर दोन मुले जन्मास आली होती. तुळींज पोलिसांनी मुलीच्या आई-वडील व पतीविरोधात बालविवाह प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल केला.

२. नालासोपाऱ्यातील १६ वर्षांची मुलगी अल्पवयीन असताना तिचा बालविवाह केला होता. त्यानंतर पीडित मुलगी अल्पवयीन असून, एका मुलीला जन्म दिला होता. त्यावेळी त्या अल्पवयीन मुलीचे वय उघड झाले. याबाबत बालविवाह केल्याप्रकरणी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.



Scanned with CamScanner

MHT
मुंबई
# हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, मंगलवार 7 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

शिंदे-फडणवीस सरकार रोजाना करती है 20 लाख खर्च
...पेज-3

ग्रैमी अवॉर्ड्स में भारत का डंका
...पेज-6

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| | 7.11am 6.35pm | | अधिकतम 32°C न्यूनतम 22°C | NSE BSE | |

# बाइक व साइकिल चोरी करने वाले गैंग का पर्दाफाश
## 12 साइकिल बरामद, 6 मामलों का हुआ खुलासा



### पहले भी मामले हैं दर्ज

भरतकुमार रगाराम पुरोहित (35) की नालासोपारा पूर्व के गाला नगर क्षेत्र से एक मोटरसाइकिल बिल्डिंग के सामने से चोरी हो गई थी। इस मामले में पुरोहित ने नजदीकी पुलिस स्टेशन में अज्ञात चोर के खिलाफ केस दर्ज करवाया था। जिसके बाद डिटेक्शन ब्रांच ने तकनीकी विश्लेषण के माध्यम से एवं सीसीटीवी फुटेज के आधार पर जाल बिछा कर दो संदिग्ध को हिरासत में ले लिया। उसने अपना नाम सलाउद्दीन सलिम खान, व्यावसाय भंगार विक्री व बिपीन दिलीप राय, व्यवसाय रिक्शाचालक बताया, जिसके बाद दोनों को पुलिस स्टेशन लाया गया और उससे आगे की पूछताछ में खुलासा हुआ कि आरोपी बिपीन दिलीप राय पर आचोले पुलिस स्टेशन में मामला दर्ज है।

**वसई।** आचोले पुलिस ने बाइक व साइकिल चोरी करने वाले गैंग का पर्दाफाश किया है। बाइक चोरी के आरोप में सलाउद्दीन सलीम खान, बिपिन दिलीप राय, जिशान अहमद, इबरार खान, अविनाश वाल्मीकि को गिरफ्तार किया है। इनके पास से दो बाइक व चार स्क्रैप की गई बाइक बरामद की गई है।

गिरफ्तार आरोपी बाइक चुराकर भंगार वालों को बेच देते थे। गिरफ्तार आरोपियों पर कई मामले दर्ज हैं। इसी तरह पुलिस ने साइकिल चोरी करने वाले भरत वाघरी को गिरफ्तार कर उसके पास से 12 साइकिल बरामद की है। पुलिस ने बताया कि भरत वाघरी साईकिल चुराकर भंगार माफिया मोहसिन यूनुस मलिक को बेच देता था। जिसके बाद मोहसिन साइकिल मॉडीफाय करके उन्हें महंगी दाम पर बेचता था।

**आरोपियों ने कबूले जूर्म**

आरोपी सलाहुद्दीन सलीम खान ने अलकापुरी, गालानगर और नालासोपारा क्षेत्र से मोटरसाइकिल व पुराने कबाड़ वाहनों की चोरी कर कबाड़ के रूप में बेचने की जानकारी दी और दोनों आरोपियों ने कबूल किया कि उन्होंने 25 जनवरी को रात 2 बजे से 3 बजे के बीच क्रिस्टराज हाई स्कूल के पास से काले रंग की मोटर साइकिल संख्या एमएच 01एजे 8801 चोरी करने की साजिश रची थी। टेंपो से भरकर जीशान स्क्रैप स्थित बेचने की भी बात स्वीकार की है। पुलिस ने बताया कि सलाउद्दीन सलीम खान (22), व्यवसाय - भंगार विक्री, बिपीन दिलीप राय (27) व्यवसाय - रिक्षा चालक, जिशान अहमद इब्रार खान (27), व्यवसाय - भंगार खरेदी, विक्री और अविनाश नानकचंद वाल्मिकी (30) व्यवसाय ड्रा चालक है। इन सभी से गहनता से पूछताछ की तो उनके पास से एक लाख 40 हजार रुपये का कीमती सामान जब्त और कंपनी की साइकिल चोरी करने वाले शातिर अपराधी भरत चमन वाघरी व मोहसीन यूनुस मलीक को गिरफ्तार किया गया। इस तरह पुलिस ने छह मामलों का खुलासा करते हुए लगभग तीन लाख का माल बरामद किया है।

Scanned with CamScanner

# विरार में पकड़ा गया 55 लाख रुपये का गुटखा

File Pic



■ **निसं, विरार:** मांडवी पुलिस और एफडीए की टीम ने मुंबई अहमदाबाद हाइवे स्थित सकवार गांव के पास छापा मार कर 55 लाख रुपये मूल्य का प्रतिबंधित गुटखा जब्त किया है। इस मामले में छह लोगों के खिलाफ केस दर्ज हुआ है। ठाणे एफडीए अधिकारी उत्तरेश्वर साहेबराव बडे को गुप्त सूचना मिली थी कि गुजरात से एक ट्रक में भारी मात्रा में प्रतिबंधित गुटखा मुंबई लाया जा रहा है। सूचना के बाद एफडीए टीम व पुलिस ने सकवार गांव के पास जाल बिछाया। मेक्सेस होटल में पार्क किया गया एक ट्रक की तलाशी ली, जिसमें गुटखा रखा हुआ था। इस मामले में पुलिस ने फैजान शेख़, प्रशांत अनिलकुमार सिंह, आसिफ गफ्फूर सैय्यद, रमेश कुमार मिश्रा, यतीश मिटकर व ट्रक चालक माधव थिगोटे के खिलाफ केस दर्ज किया है।

Scanned with CamScanner

# रेत माफिया पर कार्रवाई, 38 लोग अरेस्ट

**निसं, विरार:** मांडवी पुलिस ने अवैध रेती खनन करनेवालों के खिलाफ विशेष मुहिम चलाई है। पुलिस ने कसराली और वैतरणा खाड़ी पर रेती खनन करने वाले माफिया के खिलाफ बड़ी कार्रवाई करते हुए बोट, सेक्शन पंप समेत 35 लाख रुपये का माल जब्त किया है। मांडवी पुलिस ने अब तक 20 मामले दर्ज कर 38 लोगों को गिरफ्तार किया है। साथ ही दर्जनों बोट व 21सेक्शन पंप नष्ट किए गए हैं।

मांडवी पुलिस ने कहा- अवैध खनन करनेवालों के खिलाफ कार्रवाई रहेगी जारी

## 35 लाख रुपये का माल जब्त

जानकारी के अनुसार, प्रशासन ने वैतरणा, खानीवडे, उसगांव, कन्हेर नारंगी समेत वसई विरार के खाड़ी किनारों में रेती खनन पर प्रतिबंध लगाया है। उसके बावजूद रेती माफिया रात के समय चोरी छिपे खनन कर रहे हैं। दो दिन पहले पुलिस ने कसराली और वैतरणा खाड़ी पर छापा मार कर सागर ज्ञानेश्वर पाटील और दिलीप काशीनाथ पाटील को गिरफ्तार कर केस दर्ज किया था। पुलिस ने खनन के दौरान इस्तेमाल होने वाली बोट व सेक्शन पंप को नष्ट कर दिया था। मांडवी पुलिस ने 20 मामले में 38 लोगों को गिरफ्तार किया है, जबकि 21 सेक्शन पंप नष्ट करते हुए 35 लाख रुपये का माल बरामद किया है। यह कार्रवाई पुलिस निरीक्षक प्रफुल्ल बाघ के मार्गदर्शन में की गई है।





Scanned with CamScanner